Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | गुरुवार
१८.०६.२०२६

वरुड
# दर्पण

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १३८ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## पहिले ६ खासदार फुटले, आता बीएमसी मध्येही ठाकरेंना धक्का : मुंबईतील नगरसेवकांची संख्या कमी होणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – एकीकडे ऑपरेशन टायगर अंतर्गत शिवसेना ठाकरे गटाचे ६ खासदार फुटले आहेत.

तर दुसरीकडे आता मुंबई महानगरपालिकेत शिवसेना ठाकरे गटाला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. शिवसेनेचे ठाकरे गटाचे नगरसेवक दीपक सावंत यांच्यावर अपात्रतेची कारवाईची घोषणा करण्यात येणार आहे. दीपक सावंत यांच्या अपात्रतेची प्रत महापालिकेकडे दाखल झाली आहे. दीपक सावंत भांडूपमधील प्रभाग क्रमांक १११ मधून निवडणून आले होते.

दीपक सावंत यांचे जात वैधता प्रमाणपत्र



रद्द झाले होते. जात वैधता प्रमाणपत्र रद्द झाल्यानंतर आता दीपक सावंत यांच्यावर अपात्रतेची कारवाई होणार आहे.

त्यामुळे शिवसेना ठाकरे गटाची नगरसेवकांची संख्या ६५ वरुन ६४ होणार आहे. कुणबी आरक्षित जागेवरून निवडून आले होते. मात्र जात पडताळणी समितीने कुणबी दावा फेटाळला. त्यामुळे आता भांडुपमधील जागा रिक्त होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मुंबई महापालिका सभागृहात जर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नगरसेवक दीपक सावंत यांच्या अपात्रतेचा निर्णय मंजूर झाला, तर त्याचा थेट परिणाम पालिकेतील विविध समित्यांच्या संख्याबळावर होण्याची शक्यता आहे. दीपक सावंत यांच्या अपात्रतेनंतर ठाकरे गटाची सभागृहातील संख्या ६५ वरून ६४ होणार आहे. त्यामुळे स्थायी समिती, प्रभाग समिती तसेच इतर महत्त्वाच्या समित्यांमध्ये ठाकरे गटाला मिळालेल्या प्रतिनिधित्वाच्या समीकरणात बदल होऊ शकतो.

समित्यांमध्ये पक्षांच्या संख्याबळाच्या आधारावर सदस्यसंख्या ठरवली जाते. त्यामुळे एका नगरसेवकाची संख्या कमी झाल्यास ठाकरे गटाच्या वाट्याला असलेल्या काही जागांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भांडुपमधील जागा रिक्त झाल्यानंतर आगामी काळात या जागेवर पोटनिवडणूक होण्याची शक्यता असून, तोपर्यंत पालिकेतील राजकीय गणित बदललेले पाहायला मिळू शकते.

## चांदा ते बांदा एफडीएच्या कारवायांचा धडाका!

### राज्यभरात २१ आस्थापनांवर धाड, १७ जणांना अटक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाची सूत्रे हाती घेतल्यापासून तुकाराम मुंढे यांनी भेसळखोर आणि बनावट उत्पादन विकणाऱ्यांविरोधात राज्यभरात कारवाईचा धडाका लावला आहे. जवळपास दररोज राज्याच्या विविध भागात एफडीएच्या पथकांकडून धाडी टाकल्या जात आहेत. परिणामी अन्न व औषध प्रशासनाची राज्यभर धडक कारवाईचं नागरिकांकडून जोरदार स्वागत देखील केलं जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार राज्यभरातील २१ आस्थापनांवर अन्न व औषध प्रशासनाच्या धाडी टाकत प्रतिबंधित गुटखा, पानमसाला साठ्यावर मोठी कारवाई केली आहे. यात ७ लाख ४३ हजार ११७ रुपयांचा प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला आहे. तर विक्री, वितरण आणि






वाहतुकीप्रकरणी १७ जणांना अटक देखील करण्यात आली आहे. या कारवाईदरम्यान ३ वाहनेही जप्त करण्यात आली आहे.

राज्यभरात १२ एफआयआर, बृहन्मुंबई विभागात सर्वाधिक आस्थापनांची तपासणी अन्न व औषध प्रशासनाची राज्यभर धडक कारवाई करत राज्यभरात १२ एफआयआर दाखल करण्यात आले आहे. तर ७ आस्थापना देखील सील करण्यात आलं आहे. बृहन्मुंबई विभागात सर्वाधिक १३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली आहे. ज्यामध्ये बृहन्मुंबईत ८ जणांना अटक करण्यात आली असून १ लाख रुपयांहून अधिक माल जप्त करण्यात आला आहे. नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये वाहने देखील जप्त करण्यात आली आहे. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार हि कारवाई करण्यात आली आहे. सोबतच, प्रतिबंधित अन्नपदार्थांविरोधात मोहीम आणखी तीव्र करण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे. विभागनिहाय कारवाई अमरावती २ आस्थापनांवर कारवाई, २७,२०६ चा माल जप्त, २ जण अटक.

### थोडक्यात

## अतिरिक्त शिक्षकांचे मुंबईतच समायोजन करा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना मुंबई बाहेर न जाता मुंबईत समायोजन करा, शिक्षकांचे पगार बंद करु नका, असे निर्देश मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज दिले.

दुसरीकडे बृहमुंबई महानगर पालिकेच्या विविध शाळांमध्ये शिक्षकांची लक्षणीय पदे रिक्त असल्याने खाजगी अनुदानित शाळांमधील अतिरिक्त शिक्षकांचे महानगरपालिका शाळांमधील रिक्त पदांवर समायोजन करावे, अशी मागणी भाजपा शिक्षक आघाडीचे अध्यक्ष राजू बंडगर यांनी मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड.आशिष शेलार यांच्याकडे केली होती.

## खुल्या कारागृहांच्या व्यवस्थापनासाठी राज्य सरकारची समिती

### सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्रातील खुल्या कारागृहांच्या (ओपन जेल्स) सद्यस्थितीचा आढावा घेणे, त्यांचा विस्तार करणे आणि त्यांच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी राज्य सरकारने तीन सदस्यांची उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने या वर्षी २६ फेब्रुवारीला दिलेल्या एका महत्त्वपूर्ण निकालानंतर राज्य शासनाने हा निर्णय घेतला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले होते की, बंदिस्त तुरुंगांमधील कैद्यांची अतिरिक्त गर्दी ही एक



मोठी व्यवस्थात्मक समस्या आहे. यावर 'खुल्या सुधारसंस्था' (ओसीआय) हा एक प्रभावी आणि मानवी दृष्टिकोन असलेला उपाय ठरू शकतो.

न्यायालयाच्या या निर्देशांची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात देखरेख समिती स्थापन करणे अनिवार्य करण्यात आले होते. त्यानुसार महाराष्ट्र सरकारने ही राज्यस्तरीय समिती स्थापन केली आहे.

## गैरहजर राहिलेल्या बीएलओ वर तूर्तास कारवाई नाही

### निवडणूक अधिकाऱ्यांची न्यायालयाला तोंडी हमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मतदार याद्यांच्या विशेष सखोल पडताळणी मोहिमेसाठी 'बूथ लेव्हल ऑफिसर' (बीएलओ) म्हणून काम करण्याला विरोध करीत विनाअनुदानित शाळांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. ड्युटीचा आदेश धुडकावल्याबद्दल कारणे दाखवा नोटीस बजावली असून त्या नोटिसीला याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले आहे. त्यावर याचिकेवर पुढील सुनावणी होईपर्यंत कोणतीही दंडात्मक किंवा सक्तीची कारवाई करणार नाही, अशी तोंडी हमी निवडणूक अधिकाऱ्यांतर्फे न्यायालयात देण्यात आली. त्यामुळे शाळांना तात्पुरता दिलासा



मिळाला आहे.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना बीएलओ म्हणून काम करण्याची सक्ती केल्याप्रकरणी मढाई कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन ट्रस्ट (कांदिवली आणि मालाडमधील चिल्ड्रन्स अकॅडमीचे व्यवस्थापन), विनाअनुदानित शाळा मंच, मारवाडी संमेलन व पीडित शिक्षकांनी याचिका दाखल केल्या आहेत. संबंधित याचिकांवर प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे व न्यायमूर्ती गौतम अनखड यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली.

शिक्षणावर, शिक्षकांच्या जबाबदाऱ्यांवर विपरित परिणाम निवडणूक कर्तव्यांमुळे शाळांच्या कामकाजावर, विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर आणि शिक्षकांच्या जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होत आहे, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला.

### जरुडकडे पायदळ जात असलेल्या दोघांना

## दुचाकी चालकाची धडक : दोघे जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शहापुर येथुन जरुडकडे पायदळ जात असलेल्या दोघांना दुचाकी चालकाने त्याची दुचाकी भरधाव व निष्काळजीपणाने चालवुन गंभिर जखमी केल्याची घटना काल (ता.१६) दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणी पोलिंसानी दुचाकी चालकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी राहुल काळपांडे व त्यांचा मित्र दिनेश प्रकाश वाघमारे हे दोघे पायी शहापूर इथून जरुड रस्त्यावरील



यावलकर पेट्रोल पंपावर विटांनी भरलेली आयशर गाडी रिकामी करायची असल्याने पायी जात असताना त्यांच्या पाठीमागून हिरो होंडा स्प्लेंडर क्रमांक एम एस २७ डी आर ३०६८ क्रमांकाच्या भरधाव व अनियंत्रीत दुचाकी चालकाने वाहन निष्काळजीपणाने चालवुन फिर्यादी व त्याच्या मित्रास जोरदार धडक मारली.

या धडकेत पायदळ जात असलेले दोघेही गंभीररित्या जखमी झाले.

या प्रकरणी राहुल सुधाकर काळपांडे (३१) रा.शहापूर यांचे फिर्यादीवरून वरुड पोलिसांनी दुचाकी क्रमांक एम एस २७ डी आर ३०६८ क्रमांकाचा चालक मनोज मंगल उईके (३५) रा.राजुर नाका, वरुड याच्याविरुद्ध कलम २८१ (अ), १२५ (ब), १२५ ब भारतीय न्याय संहिता २०२३ गुन्हा दाखल करून तपासात घेतला.

## दुचाकीच्या धडकेत ९ वर्षीय बालिका गंभिर जखमी

### महात्मा फुले चौक ते पार्डी चौक रस्त्यादरम्यानची घटना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – मोबाईल चार्जर विकत घेण्याकरीता महात्मा फुले चौक ते पार्डी चौक रस्त्या दरम्यान जात असतांना अज्ञात भरधाव व अनियंत्रीत मोपेड चालकाने धडक देवुन ९ वर्षीय बालिकेला गंभिर जखमी केल्याची घटना दुपारी १२ वाजताच्या सुमारास घडली. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी अज्ञात दुचाकीचालकाविरुध्द




गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहीतीनुसार, फिर्यादी शेख इलियास हे त्यांची मुलगी माहेरा फातिमा हिला सोबत घेऊन मोबाईल चार्जर घेण्याकरीता गेले असता पार्टी बोरांगजवळील वीरा मोबाईल शॉपी समोर अज्ञात मोपेड स्कुटी मोटरसायकल चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन मोपेड स्कूटीले ९ वर्षीय बालिकेला धडक दिल्यामुळे ती गंभिर जखमी झाली.

या प्रकरणी शेख इलीययास शेख नबी (४०) रा.नया दायरा वरुड यांचे फिर्यादीवरुन अज्ञात दुचाकी चालका विरुद्ध पोलिसांनी कलम २८१, १२५ (ब) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.




# भाजप युवा मोर्चाचे दक्षिण मुंबई अध्यक्ष अर्जुन मेघे यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश




(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – भाजप युवा मोर्चाचे दक्षिण मुंबई अध्यक्ष आणि माजी मंत्री स्वर्गीय दत्ता मेघे यांचे चिरंजीव अर्जुन मेघे यांनी आज अधिकृतपणे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे घड्याळ हाती बांधले असून, या पक्षप्रवेशाने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. पक्षप्रवेश सोहळा मुंबईत आयोजित एका विशेष कार्यक्रमात काँग्रेसचे राष्ट्रवादी विदर्भातील नेते आणि राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. अर्जुन मेघे यांनी आपल्या समर्थकांसह पक्षात प्रवेश केल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक संघटनेला मोठी बळकटी मिळाली आहे. कार्यक्रमास उपस्थित मान्यवर: इंद्रनील नाईक: राज्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेस, संजय खोडके: ज्येष्ठ नेते तथा आमदार, राष्ट्रवादी काँग्रेस, धीरज शर्मा: राष्ट्रीय युवक अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, उमेश पाटील: नेते, राष्ट्रवादी काँग्रेस, सुरज चव्हाण: प्रदेश प्रवक्ते, राष्ट्रवादी काँग्रेस, लतिफ तांबोळी: प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस नेत्यांची प्रतिक्रिया पक्षप्रवेशावेळी मंत्री इंद्रनील नाईक, राष्ट्रीय युवक अध्यक्ष धीरज शर्मा आणि स्वतः अर्जुन मेघे यांनी आपले विचार मांडले. अर्जुन मेघे यांच्या या निर्णयामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, आगामी काळात पक्षातर्फे त्यांच्यावर कोणती महत्त्वाची जबाबदारी सोपवली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

### पेस आयआयटी व नीट येथे

# आयआयटी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण कौस्तुभ यांचा विद्यार्थ्यांशी संवाद

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**वरुड** – नुकत्याच जाहीर झालेल्या आयआयटी-जेईई प्रवेश परीक्षेत यश संपादन करणाऱ्या कौस्तुभ सुनील वाडीकर यांनी पेस आयआयटी व नीट इन्स्टिट्यूट वरुड येथे विद्यार्थ्यांशी प्रेरणादायी संवाद साधला. यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. संवादादरम्यान कौस्तुभ वाडीकर यांनी आपल्या यशाचा प्रवास, अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, स्पर्धा परीक्षेची तयारी करताना येणाऱ्या अडचणी आणि त्यांवर मात करण्याच्या पद्धती याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास, आत्मविश्वास, सातत्य आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचा सल्ला दिला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जेईई व नीटची तयारी करण्याकरिता स्पेस आयआयटी व नीट इन्स्टिट्यूट ही एक विश्वसनीय संस्था आहे. त्याचा वरुड व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन आपल्या प्रगतीच्या वाटा अधिक रुंद कराव्यात असे आवाहनही या प्रसंगी कौस्तुभ यांनी केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी आयआयटी प्रवेश परीक्षेबाबत विविध प्रश्न विचारले. कौस्तुभ यांनी प्रत्येक प्रश्नाचे सविस्तर उत्तर देत तयारीसाठी उपयुक्त टिप्स दिल्या. त्यांच्या अनुभवांमुळे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी नवी प्रेरणा मिळाली. कार्यक्रमात संस्थेचे संचालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी कौस्तुभ वाडीकर यांच्या यशाबद्दल अभिनंदन करून त्यांच्या भावी शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेच्या वतीने कौस्तुभ वाडीकर यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

याप्रसंगी पेस आयआयटी व मेडिकल वरुडचे व्यवस्थापक भूषण गवई, आयआयटी भुवनेश्वरचे भौतिकशास्त्र विभाग प्रा.विकास पटेल, आयआयटी रोपर रसायनशास्त्र विभाग प्रा.प्रिन्स गौतम, एनआयटी गणित विभाग, प्रा.सतीश कुमार सिंग, जीवशास्त्र विभाग प्रा.अर्चना फुटाणे, सह व्यवस्थापक आकाश बाहे, समुपदेशक विराग म्हस्की, अकॅडमीक समन्वयक मयुरी धवस, समुपदेशक मयुरी ढोक, अकाउंटट दीपक नाडगे, मयूर चौरासे, लोकेश शेळके, शिक्षकेतर कर्मचारी, बहुसंख्येने विद्यार्थी तसेच पालकांची उपस्थिती होती.

---

# 'इंडो-पॅसिफिक कमांड' नावातून 'इंडो' शब्द वगळला : पुन्हा केले 'यूएस पॅसिफिक कमांड'

(प्रतिनिधी वरुड दर्पण)






**वॉशिंग्टन** – अमेरिकेने एका मोठ्या धोरणात्मक निर्णयांतर्गत आपल्या 'यूएस इंडो-पॅसिफिक कमांड'च्या नावातून इंडो हा शब्द वगळला असून आता पुन्हा 'यूएस पॅसिफिक कमांड' असे नामकरण केले आहे. या निर्णयामुळे अमेरिकेने आपला ८ वर्षे जुना निर्णय मागे घेतला आहे.

अमेरिकेच्या संरक्षण मंत्रालयाने मंगळवारी या निर्णयाची घोषणा केली. संरक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले की, १९४७ मध्ये तत्कालीन राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रुमन यांनी स्थापन केलेल्या या कमांडच्या ऐतिहासिक वारशाचा आणि मुळांचा आदर करण्यासाठी हा बदल करण्यात आला आहे.

ऐतिहासिक वारसा अमेरिकन संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, '१ जानेवारी १९४७ रोजी राष्ट्राध्यक्ष हॅरी एस. ट्रुमन यांच्याद्वारे स्थापित करण्यात आलेली ही कमांड ७० वर्षांहून अधिक काळ कार्यरत होती.

ही युनायटेड स्टेट्सच्या संयुक्त लढाऊ कमांड्सपैकी सर्वात जुनी आणि सर्वात मोठी कमांड आहे. यापूर्वी २०१८ मध्ये, अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात या कमांडचे नाव बदलून 'यूएस इंडो-पॅसिफिक कमांड' करण्यात आले होते.

---

# धावत्या बसमधून धूर, अन काही क्षणांत आग

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**बारामती** – पुण्यातील बारामती तालुक्यातील पणदरे खिंडीत आज सकाळी एक मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. निरा-बारामती मार्गावर धावणाऱ्या सीएनजीएसटी बसला अचानक आग (फायर) लागल्याने काही काळ परिसरात खळबळ उडाली. सुदैवाने चालक, वाहक आणि प्रवाशांच्या सतर्कतेमुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही.

माहितीनुसार, आज सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. बस पणदरे खिंडीतून निराच्या दिशेने जात असताना चालकाच्या लक्षात आले की बसमधून धूर निघत आहे. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून चालकाने तातडीने बस रस्त्याच्या कडेला थांबवली. यानंतर बसमधील सर्व प्रवाशांना त्वरित खाली उतरवण्यात आले. काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. आगीची तीव्रता इतकी होती की काही वेळातच बस पूर्णपणे जळून खाक झाली. घटनास्थळी बसचा केवळ सांगाडा शिल्लक राहिल्याचे दिसून आले.

---

# पीसीएम, पीसीबी सीईटी दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी बीबीए, बीसीए प्रवेशाची सुवर्णसंधी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून बीबीए, बीसीए व इतर व्यवस्थापन अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल केला आहे. या निर्णयामुळे आता एमएचटी-सीईटी (पीसीएम, पीसीबी) परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनाही बीबीए व बीसीए अभ्यासक्रमांसाठी




प्रवेश घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

यापूर्वी बीबीए, बीसीए प्रवेशासाठी स्वतंत्र एमएएच बीबीए / बीसीए / बीसीए-सीईटी परीक्षा देणे आवश्यक होते. मात्र अनेक महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणात जागा रिक्त राहात असल्याने आणि विद्यार्थ्यांना अधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासनाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

शासनाच्या नव्या धोरणामुळे विज्ञान शाखेतील पीसीएम (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित) तसेच पीसीबी (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जिवशास्त्र) गटातील विद्यार्थ्यांना व्यवस्थापन आणि संगणक शिक्षण क्षेत्रात करिअर घडविण्याचा नवा मार्ग खुला झाला आहे. विशेषतः बारावीनंतर करिअरचे विविध पर्याय शोधणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा निर्णय लाभदायक ठरणार आहे. तज्ज्ञांच्या मते, बीबीए हा अभ्यासक्रम व्यवस्थापन, बँकिंग, वित्त, विपणन, मानव संसाधन व्यवस्थापन आणि उद्योजकता यांसारख्या क्षेत्रांमध्ये करिअर घडविण्यासाठी उपयुक्त आहे तसेच पुढील एमबीए शिक्षणासाठीही बीबीए हा भक्कम पाया मानला जातो. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतलेल्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम निवडीसाठी पर्याय उपलब्ध झाले आहे.

---

# क्रांतीज्योती ब्रिगेड वरूड शाखेतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात साजरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)







**वरुड** – क्रांतीज्योती ब्रिगेड महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने प्रतिवर्षी घेण्यात येणारा दहावी व बारावीचे विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा याही वर्षी क्रांतीज्योती ब्रिगेड वरुड शाखेच्या वतीने एनटीआर हायस्कूलचे सभागृहामध्ये मोठ्या उत्साहात पार पडला.

याप्रसंगी शहरातील शाळा व महाविद्यालयातील दहावी व बारावीचे एकूण ४५ विद्यार्थ्यांना निमंत्रित करण्यात आले होते तसेच या सोहळ्यात डॉ.तन्मय चंद्रकांत भड यांनी एमबीबीएस परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल त्यांचाही सन्मान करण्याकरिता आमंत्रित केले होते, तेव्हा काही विद्यार्थी व काही विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच त्यांना शुभेच्छा देण्याकरिता वरुड शहरातील गणमान्य व्यक्ती यांनी ब्रिगेडचे विनंतीवरून या सोहळ्याला हजेरी लावुन आयोजकांचा उत्साह वाढविला. गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, मोमेंटो व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी डॉ.शामाप्रसाद मुखर्जी शेंदूरजनाघाटचे प्राचार्य रा.ना .फुलारी, उद्घाटक प्रसिद्ध सर्जन डॉ.सुधाकर बंदे तर विशेष उपस्थितीमध्ये क्रांती ब्रिगेड महाराष्ट्र प्रदेश संस्थापक अध्यक्ष ॲड.नंदेश अंबाडकर उपस्थित होते तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये प्राचार्य योगेश बरडिया, प्राचार्य विजय आडे, माजी प्राचार्य पी.एल.कळमकर, माजी प्राचार्य रामराव वानखडे, नवयुवक शिक्षण संस्थेचे सचिव जगदीश नेरकर, क्रांतीज्योती ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुभाष मालपे, मुख्याध्यापक नितीन ठाकरे, डॉ.मीना बंदे, क्रांतीज्योती ब्रिगेडचे अमरावती येथूनआलेले पदाधिकारी ओमप्रकाश अंबाडकर, प्रदीप शेवतकर, प्रभाकर वानखडे, शेतकरी संघटनेचे नेते दिलीप भोयर, डॉ.नीलकंठ यावलकर, माजी नगराध्यक्ष जया नेरकर, रामभाऊ ढोरे प्रामुख्याने उपस्थित होते.

याच कार्यक्रमात क्रांतीज्योती ब्रिगेड सचिव तथा माजी नगराध्यक्ष दिनेश खेरडे यांचा वाढदिवस सुद्धा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन साजरा करण्यात आला. यावेळी त्यांच्यासाठी क्रांतीज्योती ब्रिगेडचे अध्यक्ष सुकांत यावले व संपुर्ण पदाधिकाऱ्यांनी गित गायन करुन त्यांचा वाढदिवस साजरा केला.

कार्यक्रमाचे यशस्वितेकरिता ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी सर्वश्री जिल्हा कार्याध्यक्ष व संघटक विनय चौधरी, बाबा फरकाडे, अशोक देवते, प्रा.किशोर तडस, सुकांत यावले, राजू घुमटकर, भागवत आडे, दिनेश खेरडे, प्रभाकर काळे, संजय पवार, नितीन गंगणे, घनश्याम कळमकर, सुभाष राऊत, विनोद भेलकर तसेच ब्रिगेडच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे संचालन नीता पाटील यांनी, प्रास्तविक जिल्हा कार्याध्यक्ष व संघटक विनय चौधरी तर आभार भागवत आडे यांनी मानले. यावेळी एनटीआर शाळेचे संचालकांनी हॉल व माईक सिस्टिम उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे तसेच पवन खंडेलवाल ई स्कूल वरुड यांनी मोमेंटो दिल्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानण्यात आले. कार्यक्रम उपस्थित सर्वांना अल्पोपहार व चहा देऊन नियोजनबद्ध यशस्वी संपन्न झाला.

# संपादकीय

{ चला आपले आज आपण येणाऱ्या पिढीच्या उज्वल भविष्या साठी त्याग करू. }

## 'राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७' आणि 'आयुष्मान भारत': भारतीय आरोग्य व्यवस्थेचा सुवर्णकाळ

स्वातंत्र्योत्तर भारतात आरोग्य क्षेत्राला एका निश्चित आणि दूरगामी दिशेची गरज होती. ती दिशा खऱ्या अर्थाने 'राष्ट्रीय आरोग्य धोरण- २०१७'ने दिली. या धोरणाने केवळ आजारांवर उपचार करण्यापेक्षा 'वेलनेस' म्हणजेच सुदृढ आरोग्याला प्राधान्य दिले. या धोरणाच्याच मार्गदर्शनाखाली 'राष्ट्रीय आरोग्य मिशन' अंतर्गत ग्रामीण भागातील अगदी शेवटच्या घटकापर्यंत, म्हणजेच उप आरोग्य केंद्रांपर्यंत प्रसूती व माता-बाल संगोपनाच्या पायाभूत सुविधा पोहोचवल्या गेल्या. एवढेच नव्हे, तर या प्राथमिक सुविधांना जिल्हा व प्रदेश स्तरावरील मोठ्या रुग्णालयांच्या नेटवर्कशी जोडण्यात आले. या संपूर्ण आरोग्य संरचनेला अधिक मजबूत, सर्वसमावेशक आणि शाश्वत बनवण्यासाठी 'आयुष्मान भारत' योजनेने प्रवेश केला आणि या व्यवस्थेला चार महत्त्वाचे कार्यरत स्तंभ बहाल केले. हा केवळ एका योजनेचा विस्तार नाही, तर भारतीय आरोग्य व्यवस्थेचे झालेले संपूर्ण रूपांतर आहे. १. पायाभरणी: राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७ आणि पायाभूत सुविधांचा विस्तार २०१७ च्या आरोग्य धोरणाने 'सर्वांसाठी आरोग्य' हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवले. आरोग्यावरील सरकारी खर्च जीडीपीच्या २.५ टक्क्यांपर्यंत वाढवणे, आयुर्मान वाढवणे आणि उपचारांचा खिशावर पडणारा भार कमी करणे, ही या धोरणाची प्रमुख उद्दिष्टे होती. या धोरणाची पहिली मोठी यशस्वी अंमलबजावणी 'राष्ट्रीय आरोग्य मिशन' अंतर्गत दिसून आली. ग्रामीण आणि दुर्गम भागातील माता मृत्यू दर आणि बाल मृत्यू दर कमी करण्यासाठी 'संस्थात्मक प्रसूती' वाढवणे गरजेचे होते. या मिशनअंतर्गत: ग्रामीण उपकेंद्रांचे सक्षमीकरण: गावोगावच्या उप आरोग्य केंद्रांमध्ये २४ तास प्रसूती सुविधा, आवश्यक औषधे आणि प्रशिक्षित परिचारिका उपलब्ध करून देण्यात आल्या. रेफरल सिस्टीमची साखळी: जर उपकेंद्रात एखादी गुंतागुंत निर्माण झाली, तर तिथून तात्काळ प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय आणि थेट प्रदेश स्तरावरील जिल्हा किंवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांपर्यंत रुग्णाला सुरक्षितपणे पोहोचवण्यासाठी '१०२' आणि '१०८' रुग्णवाहिका सेवांचे जाळे निर्माण केले गेले. या पायाभूत सुविधांमुळे दुर्गम भागातील गरिबांनाही दर्जेदार प्रसूती आणि तातडीच्या आरोग्य सेवा मिळणे शक्य झाले. २. आयुष्मान भारत: व्यवस्थेचे चार मजबूत कार्यरत स्तंभ राष्ट्रीय आरोग्य धोरणाने निश्चित केलेल्या मार्गावर गती घेण्यासाठी आणि संपूर्ण आरोग्य साखळीला एका सूत्रात बांधण्यासाठी २०१८ मध्ये 'आयुष्मान भारत' या जगातील सर्वात मोठ्या सरकारी अर्थसहाय्यित आरोग्य योजनेची सुरुवात झाली. या योजनेने भारतीय आरोग्य व्यवस्थेला खालील चार महत्त्वाच्या स्तंभांवर उभे केले आहे: स्तंभ १: आयुष्मान आरोग्य मंदिर हा आयुष्मान भारतचा पहिला आणि सर्वात महत्त्वाचा पायाभूत स्तंभ आहे. देशातील १.५ लाखांपेक्षा जास्त उपकेंद्रे आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांचे रूपांतर 'आयुष्मान आरोग्य मंदिर'मध्ये करण्यात आले आहे. स्वरूप: हे केवळ उपचारांचे केंद्र नाही, तर ते 'वेलनेस' केंद्र आहे. येथे माता आणि बाल संगोपनासोबतच, असंसर्गजन्य आजार (उदा.मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग) यांचे प्राथमिक स्क्रीनिंग केले जाते. वैशिष्ट्य: येथे मोफत आवश्यक औषधे, मोफत प्रयोगशाळा चाचण्या आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे योगासने व निरोगी जीवनशैलीचे धडे दिले जातात. हा स्तंभ आजार रोखण्यावर भर देतो. स्तंभ २: प्रधानमंत्री जन आरोग्य योजना प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार न होणाऱ्या गंभीर आजारांसाठी हा दुसरा स्तंभ काम करतो. ही जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा योजना आहे. स्वरूप: देशातील गरीब आणि वंचित घटकातील सुमारे १२ कोटी कुटुंबांना (अंदाजे ५५ कोटी नागरिक) प्रतिवर्ष प्रतिकुटुंब ५ लाख रुपयांचे मोफत विमा संरक्षण दिले जाते. वैशिष्ट्य: यामध्ये कर्करोग, हृदयविकार, किडनी निकामी होणे यासारख्या १३०० पेक्षा जास्त गंभीर आजारांवरील शस्त्रक्रिया आणि उपचारांचा समावेश आहे. खाजगी आणि सरकारी दोन्ही प्रकारच्या नोंदणीकृत रुग्णालयांमध्ये ही सेवा पूर्णपणे कॅशलेस (नगद विरहित) आहे. यामुळे कोट्यवधी कुटुंबे उपचाराच्या खर्चामुळे कर्जबाजारी होण्यापासून वाचली आहेत. स्तंभ ३: आयुष्मान भारत डिजिटल मिशन आरोग्य क्षेत्राला आधुनिकतेची जोड देणारा हा तिसरा आणि अत्यंत गतिमान स्तंभ आहे. भारतात डिजिटल आरोग्य परिसंस्था निर्माण करणे हे याचे ध्येय आहे. स्वरूप: याअंतर्गत प्रत्येक नागरिकाचे 'आभा कार्ड' म्हणजेच डिजिटल हेल्थ आयडी तयार केला जात आहे. वैशिष्ट्य: रुग्णाच्या मंजुरीने त्याचे सर्व वैद्यकीय अहवाल, प्रिस्क्रिप्शन आणि आजाराचा इतिहास या कार्डावर डिजिटल स्वरूपात साठवला जातो.

# मतदानानंतर राजकारणाचा विचार करू नका!

**सेनेचा मतदार प्रबोधनकार ठाकरे यांच्या विचारसरणीमुळे आणि बाळासाहेबांच्या राजकीय भूमिकेमुळे वाढला. १९८५ नंतर मतदारसंघावर जबर पकड असलेले काँग्रेसनेत्यांचे गड डळमळीत झाले ते यामुळेच. तुम्हालाच शिवसेना नको असेल तर मी तरी काय करू, अशी सेनेची भूमिका आहे.**



उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेचे खासदार फुटणार या बातम्यात नाविन्य नव्हते. शिवसेनेचे नेते-कार्यकर्ते वाघ म्हणवले जात, त्यामुळेच त्यांच्या फुटाफुटीच्या घडामोडी 'ऑपरेशन टायगर' या नावाने चर्चिल्या जात होत्या. हे लेबल कोणी डकवले माहिती नाही पण वाघ दिवसा बेडरपणे समोरून हल्ला करतो. तो अंधारात लपवा-छपवी करत नसतो. पण हे राजकारण आहे.

संसदेचे पावसाळी अधिवेशन जवळ येत आहे. या अधिवेशनात महिला आरक्षण कसेही करून संमत करायचे. त्यासाठी दोन तृतीयांश बहुमताची जुळवाजुळव करायची आणि मतदारसंघ पुनर्रचना करूनच पुढील लोकसभा निवडणुकांना सामोरे जायचे ही भाजपाची व्यूहरचना गेले काही दिवस राजकीय वतुर्ळात चर्चिली जात आहे. त्यासाठीच तृणमूल काँग्रेसचे खासदार फुटवले आणि आता ठाकरेंच्या सेनेची वेळ आहे, असे म्हटले जात आहे.

मागील लोकसभा निवडणुकीत ठाकरेंचे सैनिक चेव आल्यासारखे लढले. लोकांनी दोन शिवसेना व एकनाथ शिंदे यांच्याकडे अधिकृत धनुष्यबाण चिन्ह असतानाही ठाकरेंचे उमेदवार निवडून दिले. हे त्यांच्या स्वतंत्र राजकीय विचारसरणीचे कौतुक करण्यासारखेच. महायुती प्रचंड ताकदीने महाविकास आघाडीला जेरीला आणत असताना महाराष्ट्राचा मतदार महाविकास आघाडीच्या पाठीशी उभा राहिला आणि त्यांनी ४८ पैकी ३० जागा काँग्रेस, ठाकरे सेना, शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला दिल्या. मतदारांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता निर्भयपणे, स्वतंत्र बाण्याने मतदान करावे असे आवाहन केले जाते. त्या पार्श्वभूमीवर मतदारांची ही भूमिका कौतुकास्पद होती.

पण त्या कौतुकाचे मातेरे होणाऱ्या घडामोडी घडत आहेत. सध्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेची निवडणूक होत आहे. सोलापूर येथे थोरल्या पवारांच्या राष्ट्रवादीचे तीन आमदार महायुतीच्या सोबत आहेत, असे दिसते. सहा ठिकाणी तर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले. नाशिकला ठाकरे सेनेचा उमेदवारच दिसलेला नाही. या पार्श्वभूमीवर ठाकरेंचे सहा खासदार फुटणार ही बातमी फार धक्कादायक नव्हती.

महाराष्ट्रातल्या जनतेचे वैचारिक भरण-पोषण तेजस्वी इतिहास पुरुषांनी व राष्ट्रपुरुषांनी केले आहे. या राज्याला क्रांतीकारक, समाजसुधारक यांच्या उज्ज्वल कामगिरीचा वारसा आहे. त्यामुळेच इथे सत्तेसाठी अत्यंत सवंग अशा तडजोडी झाल्याचा इतिहास १९९० च्या आधी सापडत नाही. ठरवले असते तर भाई उद्धवराव पाटील यांच्यासारखा शेका पक्षाचा एक अत्यंत बुद्धिमान संसदपटू ६०च्या दशकातच यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय प्रभावाखाली राज्याचा मुख्यमंत्री झाला असता. पुढे थोड्या-फार प्रमाणात लोक पक्षांतर करत गेले पण घाऊक पद्धतीने पक्षांतरे घडवून जनमताचा लिलाव झाला नाही.

ठाकरेंचे खासदार फुटणार या बातमीने समाजमाध्यमांत प्रतिक्रियांचा पाऊस पडला. नाराजी, चिडचिड दिसली. लोकशाही मुल्यांवर थोडाफार विश्वास शिल्लक राहिलेल्यांची ही धुसफूस. 'अजून तरी आमच्या घरी कोणी आलेलं नाही', असे म्हणणारांसाठी त्या फारशा धक्कादायक नाहीत. तीच गत व्यावसायिक, उद्योगी उच्चभ्रू वर्गाची आहे. कोणीही सत्तेत असले तरी काही गोष्टी ज्या शिरस्त्याने चालतात तशाच चालणार असा या त्यांचा सूर असतो. खरा अस्वस्थ होतो तो लोकशाही मुल्यांवर विश्वास असणारा एक वर्ग.

राजकारणाची परवड त्याला अस्वस्थ करते. लोकांनी जाणीवपूर्वक ठाकरेंना राजकीय ताकद दिलेली असताना त्यांचे लोक का सोडून जातात या भावनेने तो उगाच अस्वस्थ होतो. खरे तर त्याची कोणती लढाई कोणता राजकीय पक्ष त्वेषाने लढतोय हे विचारले तर तात्काळ उत्तरही येत नाही. महागाई, घरांचे दर, शिक्षणाचा खर्च, परदेशी शिक्षण घेण्याचा खर्च वाढण्याचे व नोकऱ्यांची संधी अल्प असणे थांबत नाही. साधारणपणे रोजचे प्रश्न तेच आहेत.

पूर्वी विरोधी विचारांचा आदर केला जात असे. काँग्रेसच्या तुलनेत अतिशय लहान असलेले प्रजा समाजवादी, जनसंघ, कट्टर डावे, शेका पक्ष, पुढे भाजपा, फुटीर काँग्रेसचे गट यांनी मतदारसंघात लोकांच्या हिताची कामे अडवली जातात अशा तक्रारी केल्याचे ऐकिवात नाही. सत्ताधारी पक्षाने सरसकट विरोधी विचारांच्या लोकप्रतिनिधींचे निधी अडवत त्यांचा छळ केला अशी फार उदाहरणे नाहीत. कारण त्यावेळी लोकशाही व्यवस्था लोकांसाठीच असते अशी ठाम धारणा होती. नाही म्हणायला साखर कारखाना किंवा इतर सहकारी संस्था उभारायच्या असतील तर येता का आमच्या पक्षात असे प्रलोभन काँग्रेस दाखवत असे.

आता परिस्थिती इतकी बदलली आहे की, कार्यकर्ते अथवा समर्थक विचारांची लढाई लढण्यास तयार नाहीत. राजकारण व्यवसाय झाला. आपला नेता विरोधी पक्षात असल्याने सरकारी तिजोरी खुली होत नाही. मग छोटी-मोठी कंत्राटे मिळणार नसतील, बदल्यांची कामे होणार नसतील तर सत्तापक्षासोबत राहण्यात काय चूक आहे असे कार्यकर्ते विचारू लागले.

विरोधी पक्षीयांसाठी विकासनिधीची झारी शुक्राचार्य लाजतील इतकी अरुंद झाली. एखादा मतदारसंघ विरोधी पक्षाकडे असला की तिथले प्रशासनसुद्धा सत्तापक्ष नाराज होऊ नये याची काळजी घेऊ लागले. परिणामी हळूहळू कार्यकर्ते, समर्थक त्या नेत्यापासून दूर जाऊ लागले.

धाराशिव येथे बहुदा हेच झाले. ठाकरे सेनेचे ओमराजे निंबाळकर ३.२९ लाख एवढ्या प्रचंड बहुमताने विजयी झाले. पण त्यांचे कार्यकर्ते, समर्थक भराभर कमी होत असल्याचे लोकांना दिसू लागले. सध्या उस्मानाबाद-लातूर-बीड या स्थानिक स्वराज्य मतदारसंघाची निवडणूक सुरू आहे. तिथे ठाकरे सेनेच्या एका नेत्याने उमेदवारी अर्ज दाखल केला. पण ओमराजे यांच्यासमक्ष त्यांच्याच पक्षाच्या नगरसेवकांनी भाजपाचे उमेदवार बसवराज पाटील यांच्यासाठी माघार घेतली म्हणतात.

थोड्याफार फरकाने अशाच घडामोडी ठिकाणी घडत आहेत. विरोधात असताना पक्ष चालवणे सोपे राहिलेले नाही. राजकारण आणि लक्ष्मीदर्शन या एकाच नाण्याच्या दोन बाजू झालेल्या असताना ठाकरे सेनेचे नाणे थोडेफार चालते ते बाळासाहेब ठाकरे यांनी केलेल्या पायाभरणीमुळेच. त्यांनी शिवसैनिकांना कार्यक्रम दिला. स्पष्ट भूमिका, निर्भिडपणा आवडल्याने लोकांनी शिवसेना मोठी केली. अन्यथा चंद्रपूर, गोंदिया, नांदेड, परभणी, धाराशीव, धुळे अशा भागात सेना कशाला पोहोचली असती?

सेनेचा मतदार प्रबोधनकार ठाकरे यांच्या विचारसरणीमुळे आणि बाळासाहेबांच्या राजकीय भूमिकेमुळे वाढला. १९८५ नंतर मतदारसंघावर जबर पकड असलेले काँग्रेसनेत्यांचे गड डळमळीत झाले ते यामुळेच. पण आता काळ बदलला. तुम्हालाच शिवसेना नको असेल तर मी तरी काय करू, अशा भूमिकेत सेनेचे नेतृत्व आले आहे. त्यांची भाषा, देहबोली या सर्व गोष्टींना कंटाळली आहे असे दिसत आहे. सहा-सात महिन्यांपूर्वी राज्यात नगरपालिका, नगर पंचायती, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम पार पडला. त्यावेळी ठाकरे पिता-पुत्रांनी किती सभा घेतल्या, किती उमेदवारांना आश्वासित केले हे विचारले जाऊ लागले.

लोकांना गरज आहे तेव्हा लोकच पक्षाची काळजी घेतील ही मानसिकता कमालीची चिंताजनक आहे. राज्यासमोर अनेक समस्या आहेत, सर्व थरातील नागरिकांचे अनेक प्रश्न आहेत. राज्याची फार घौडदौड चालू आहे असेही नाही. पण सर्व समस्यांवर आवाज उठवला जातोय असे दिसत नाही. समस्याग्रस्त विरोधी पक्षाला दोष द्यायचा? की मतदान झाले आता राजकारणाकडे दुर्लक्ष करून मानसिक स्वास्थ जपा, या संभ्रमात जनता आहे.

# दुःखातून फुले वैयक्तिक विकास...

माणसांना माणसात आणण्याचं काम करणारे, पीडितांच्या जीवन:ात चैतन्याची ज्योत तेवत ठेवणारे बाबा आमटे यांचं आयुष्य म्हणजे दीनदुबळ्यांसाठी आशेचा किरण. या जाणिवेतून जगण्याच्या लढाईत युगप्रवर्तक विचारांनी प्रेरित झालेला दुःखी माणूस स्वसामर्थ्याच्या कक्षा ओळखून नवी स्वप्न पाहू लागला.

दुःखितांना आपल्या कवेत घेऊन फिरणारी आनंदवन सारखी चैतन्यमय वास्तू वैयक्तिक विकासाचा मार्ग ठरू लागली. समाजभान जपलेलं समाजमन काठी बनलं. आजाराने झिजलेल्या कृष शरीराचं मनोधैर्य उंचावण्यासाठी, त्याला उभं करण्यासाठी संघर्षाची पायाभरणी झाली. जन्मजात लढा, दुःखाला सहन करण्याची ताकद आणि वेदनेला खपली भरण्याचं काम नंदनवनाने स्वीकारलं, जोपासलं आणि पुढे जाऊन अनेकांच्या आयुष्यात स्वप्निल चांदण्याचं नंदनवन फुलवलं. दुःखितावर फुंकर घालणारी माणसं स्वतः आगीत होरपळलेली असली तरी, दैवी वरदहस्त लाभल्याने ती इतरांच्या चेहऱ्यावर आनंद पसरवतात, याचं उत्तम उदाहरण म्हणून नंदनवनाकडे पाहाता येईल. गंभीर प्रकारच्या दुर्धर आजाराने पछाडलेल्या, समाजाने वाळीत टाकलेल्या आणि अनाथांचे नाथ झालेल्या आनंदवनातल्या छत्रछायेत हजारोंनी आपला आत्मविश्वास कमावला, इथून आत्मसन्मानाची ज्योत पेटत राहिली. हाताला काम मिळाल्याने मनातला न्यूनगंड संपला, स्वप्नांना नवे पंख लाभले, मनाने गगन भरारी घेतली. विश्वासाचा जय होता होता विकासाचं श्रद्धेत परिवर्तन झालं आणि नव्या विचारांची मुळं रोवली गेली. शारीरिक दुःखातून उमललेला वैयक्तिक विकास हजारोंच्या संख्येने मैलोनमैल फैलावत गेला.

दुःखाचा सखोल विचार करता शारीरिक व्याधीतून जन्मलेलं दुःख ते मानसिक अनारोग्यातून आलेलं दुःख याचा ऊहापोह करणं म्हणजे मानवी जीवनाच्या अत्यंत नाजूक पण महत्वाच्या अशा अनिवार्य पैलूंचा विचार होणं. जीवनात कधी ना कधी संकटांचा सामना करावा लागतो. काही लोकांचं दुःख उघडपणे दिसतं तर काहींचा संघर्ष पूर्णपणे अदृश्य असतो.



कधी तो पैशांचा प्रश्न असू शकतो, तर कधी नाते संबंधातील तणाव असू शकतो किंवा स्वतःच्या मनाशी चाललेली एखादी मोठी लढाई असू शकते. यास्तव दुःखातून निर्माण होणाऱ्या मानसशास्त्राच्या पायवाटा अधोरेखित करताना त्या वाटा वैयक्तिक विकासाकडे वळल्याचे चित्र दिसतं. मानवी दुःखाचे अर्थ समजून घेताना, विकासाच्या पहिल्या टप्पात येणारा वैश्विक चिंताग्रस्त प्रश्न पडतो की, माझ्या आयुष्यात इतके दुःख का आहे? याचं उत्तर सोपं आहे, जसं की व्यक्तिगणिक दुःखाची जातकुळी वेगळी असली तरी, त्यातल्या असामान्य वेदना टाळता येत नाहीत. संघर्षातून दुःखामागील उद्देशाचा पाठपुरावा केल्यास मानवी जीवनाला त्याचा निश्चित उपयोग होऊ शकतो. संघर्षातून नवा दृष्टिकोन चित्कारतो ज्यातून मार्ग काढणं सोपं होतं. कोणतीही समस्या सोडविण्याची पाहिली पायरी म्हणजे ती समस्या आहे हे मान्य करणं त्यामुळे जितक्या लवकर आयुष्यात दुःखाचा प्रवेश होतो तितक्या लवकर ते सहन करण्याची व त्यावर मात करण्याची तसंच परिस्थितीतून उभं राहण्याची शक्ती येते.

कधी कधी मनोभूमिकेच्या सुप्तावस्थेत आदर्श परिस्थितीची गोड कल्पना आपण केलेली असते; परंतु याहून वेगळं असं नियंत्रण नसलेलं वास्तव असतं. अपेक्षेचं रान आणि वास्तवाचं भान असलेली दोन वेगळी टोकं एकत्र कशी नांदणार? हा प्रश्न नेहमीच अनुत्तरित राहतो. अपेक्षा विरुद्ध वास्तव यांतली दरी मोठी होत जाता उद्धवलेली निराशा आपण स्वीकारतो आणि त्या प्रसंगाला साजेशी मानसिकता निर्माण होते. जितक्या जास्त समस्या, अडचणी आणि दुःखे जीवनात येतात तितक्या लवकर त्यावर मात करण्याची शक्तीही त्यायोगे निर्माण होते. संकटातून सर्वश्रेष्ठ शिक्षण मिळत असल्याने आनंदातून नव्हे तर आलेल्या परिस्थितीतून आपण शिकतो आणि शहाणे होतो. दुःखाचा अर्थ शोधताना सापडलेली दुसरी अवस्था म्हणजे कठीण समय. काळावर आघात करणाऱ्या कठीण परिस्थितीत माणूस जगू लागतो तेव्हाचं त्याला जगण्याचा अर्थ उमगतो. समोरचे दुःख मानवाला प्रगल्भ बनवते, शहाणे करून सोडते आणि अंतर्मुख करते. वेदनेमागे लपलेला विकास समजायला वेळ लागतो, पण सन्मान, मर्यादा, माणुसकी, चुकीचे नातेसंबंध या गोष्टी सांभाळल्या की, मानवी वैचारिक क्षमता वाढून लवचिकता निर्माण होण्यास अवधी लागत नाही.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# चीनच्या मदतीने ५५ वर्षांनंतर बंगालच्या खाडीत पाकिस्तानची पुनरागमनाची तयारी

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**इस्लामाबाद** _ १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धातील पराभवानंतर बंगालच्या खाडीतून जवळपास पूर्णपणे माघार घेतलेल्या पाकिस्तानने आता पुन्हा या रणनीतिकदृष्ट्या महत्त्वाच्या सागरी क्षेत्राकडे मोर्चा वळवला आहे. तब्बल ५५ वर्षांनंतर पाकिस्तान बंगालच्या खाडीत आपली नौदल उपस्थिती वाढवण्याच्या तयारीत असून, त्यासाठी चीनकडून मिळालेली अत्याधुनिक 'हंगोर' पाणबुडी तैनात करण्याचा विचार सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.



गेल्याच आठवड्यात चीनने पाकिस्तानला हंगोर वर्गातील पहिली पाणबुडी सुपूर्द केली. ही पाणबुडी कराची बंदरात दाखल झाली असून, भविष्यात तिला बंगालच्या खाडीत तैनात करण्याचा पाकिस्तानचा मानस असल्याचे वृत्त आहे. या हालचालीमुळे भारतीय नौदलासमोर नवीन आव्हान उभे राहू शकते. 'हंगोर' नावामागचा इतिहास : पाकिस्तानने नव्या पाणबुडीला 'हंगोर' हे नाव देण्यामागेही एक ऐतिहासिक संदर्भ आहे. १९७१ च्या युद्धादरम्यान पाकिस्तानच्या जुन्या हंगोर पाणबुडीने भारतीय नौदलाची आयएनएस खुखरी युद्धनौका बुडवली होती. त्याच घटनेची आठवण कायम ठेवण्यासाठी आणि प्रतीकात्मक संदेश देण्यासाठी पाकिस्तानने नव्या पाणबुडीलाही तेच नाव दिल्याचे मानले जाते. बंगालच्या खाडीत उपस्थिती वाढवण्याची योजना : पाकिस्तान नौदलातील वरिष्ठ अधिकारी या योजनेवर चर्चा करत असल्याची माहिती समोर आली आहे.

एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मते, या नव्या पाणबुडीमुळे पाकिस्तानला बंगालच्या उपसागरात आपली उपस्थिती अधिक प्रभावीपणे टिकवून ठेवता येईल. १९७१ नंतर बंगालच्या खाडीत पाकिस्तानची नौदल क्षमता जवळपास नगण्य राहिली होती. पाकिस्तानच्या मुख्य नौदल तळांपासून हा भाग खूप दूर असल्याने तेथे दीर्घकालीन उपस्थिती राखणे नेहमीच आव्हानात्मक राहिले आहे. त्यामुळे ही योजना महत्त्वाकांक्षी असल्याची कबुली पाकिस्तानमधील संरक्षण तज्ज्ञही देत आहेत. चीन-पाकिस्तान नौदल सहकार्याला वेग : चीनकडून पाकिस्तान एकूण आठ अत्याधुनिक पाणबुड्या खरेदी करत आहे.

# संजय दिना पाटलांनी खोटारडेपणाची हद्द गाठली

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सहा खासदार पक्षाची साथ सोडणार यावर शिक्कामोर्तब झालं आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून व्हीप बजावून बोलावण्यात आलेल्या बैठकीला या खासदारांनी दांडी मारली आहे. ऑपरेशन टायगरमध्ये ठाकरेंच्या सेनेच्या खासदारांपैकी संजय देशमुख, संजय जाधव, नागेश पाटील आष्टीकर, भाऊसाहेब वाकचौरे, संजय दिना पाटील आणि ओमराजे निंबाळकर यांचा समावेश आहे.

या खासदारांपैकी माध्यमांच्या संपर्कात केवळ संजय दिना पाटील होते. संजय दिना पाटील हे ईशान्य मुंबईचे खासदार आहेत.

## ईशान्य मुंबईपासून दिल्लीपर्यंत खोटं बोलून फुटले



काल त्यांनी पक्षाच्या दिल्लीतील बैठकीला जाणार असल्याचं म्हटलं होतं, मात्र ते अजूनपर्यंत दिल्लीत पक्षाच्या बैठकीसाठी पोहोचले नाहीत, त्यामुळं त्यांनी माध्यमांशी बोलताना खोटेपणा केल्याची चर्चा सुरु झाली आहे.

संजय दिना पाटील काय म्हणाले होते? खासदार संजय दिना पाटील यांनी काल एका मराठी वृत्तवाहिनीसोबत बोलताना पत्रावर सही केली नसल्याचं म्हटलं होतं. पक्षाच्या बैठकीला जाणार असल्याचं म्हटलं होतं. मात्र, आज संजय दिना पाटील ठाकरेंच्या शिवसेनेच्या खासदारांच्या बैठकीला ते अजूनपर्यंत उपस्थित राहिले नाहीत.

संजय दिना पाटील काल काय म्हणाले? खासदार संजय दिना पाटील यांच्याशी काल एबीपीच्या प्रतिनिधींनी फोनवरून चर्चा केली, त्यावेळी त्यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी ते म्हणाले की, ज्याला जायचं ते जातील...जे जाणार ते तुम्हाला दिसतील... आम्हाला हैराण करू नका.

## १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिन महोत्सवाचे उदघाटन

# न.प.मैदानावर आमदार उमेश यावलकर यांचे हस्ते होणार

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** _ पतंजली योग समिति अमरावती, नगरपरिषद व महात्मा फुले बँकेच्या संयुक्त विद्यमाने बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिन महोत्सवाचे उदघाटन आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांच्या हस्ते होणार आहे.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष ईश्वर सलामे तर प्रमुख अतिथी म्हणुन महात्मा फुले बँकेचे अध्यक्ष दिलीप लोखंडे, तहसिलदार रामदास शेळके, न.प.मुख्याधिकारी गजानन भोयर, कन्फेडेरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सचे उपाध्यक्ष किशोर भगत, ठाणेदार अर्जुन ठोसरे, इंडियन मेडीकल असोशिएशनचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, नॅशनल इन्टीग्रेटेड मेडिकल असोशिएशनचे अध्यक्ष डॉ.शैलेष लोखंडे, निमा वुमन्स फोरमच्या डॉ.निता मानेकर, डॉ.मीना बंदे योग ग्रुप, संकल्प ग्रुपचे प्रा.किशोर तडस, जायन्टस ग्रुपचे अध्यक्ष विजय गुल्हाने, सर्व नगरसेवक, नगरसेविका, नगर परिषद कर्मचारी, तहसिल कर्मचारी, आय.एम.ए.चे सर्व डॉक्टर्स, निमाचे सर्व डॉक्टर्स, पोलिस कर्मचारी, व्यापारी, शेतकरी सहभागी होणार आहेत. सहभागी होणाऱ्या संस्थेमध्ये सिनियर सिटीझन फोरम, अध्यक्ष पहाटपक्षी मित्र मंडळ,संत अच्युत महाराज योग केन्द्र,निसर्गरम्य योग केन्द्र एन.टी.आर.हायस्कूल, स्वामी रामदेव बाबा योग केंद्र, साईकृपा योग केंद्र, जय हरि फाऊंडेशन व अन्य सहयोगी संस्था आहे. वरुड नगरपालिकेच्या मैदानावर सकाळी ६ वाजता योग प्राणायाम शिबिराला सुरुवात होईल, पतंजलीचे जिल्हा प्रभारी गिरीधर देशमुख यांच्या मार्गदर्शनामध्ये जिल्ह्याच्या चौदाही तालुक्यामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा होत आहे. वरुड शहरामध्ये सुद्धा हा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याकरता पतंजली योग समितीच्या सर्व शाखा आता पासुन तयारीला लागलेले आहेत. नगरपरिषद सांस्कृतिक भवन योग केंद्र, संस्कृती योगा क्लासेस द्वारा बृहन्महाराष्ट्र योग परिषद अमरावती संत अच्युत महाराज देवस्थान योग केंद्र, एनटीआर हायस्कूल, योग केंद्र, स्वामी रामदेवबाबा योग केंद्र, साईकृपा योग केंद्र ,डॉ मीना बंदे योग ग्रुप, पहाटपक्षी मित्र मंडळ या सर्व शाखा मिळून हा आंतरराष्ट्रीय योग दिन महोत्सव साजरा करण्यात येईल. प्राचार्य, मुख्याध्यापक, पोलीस स्टेशन, नगरपरिषद आणि स्वायत्त संस्थेच्या प्रमुखांना सुद्धा या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आलेले आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरता पतंजलीचे जिल्हाप्रमुख गिरीधर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हा प्रमुख व संस्कृती योगा क्लासेसच्या संचालिका स्वाती गडेकर, बृहन्महाराष्ट्र योग परिषदेचे किशोर गडेकर, महिला तालुका प्रमुख नम्रता साबळे, तालुकाप्रमुख विनोद मिसळे, तालुकाप्रमुख प्रकाश बेलसरे ,किसान पंचायतचे प्रमुख गुलाब यावले, स्वामी रामदेव बाबा योग केंद्राच्या योग शिक्षिका नीता पाटील, एनटीआर हायस्कूलचे योगशिक्षक प्रमोद पाटील, राम डोंगरे, संत अच्युतबाबा योगकेंद्राचे योगशिक्षक गुलाब यावले, महामंत्री आशा खेरडे, सह महामंत्री रेखा पोकळे, युवाभारत प्रमुख हिमानी आजनकर, सह युवाभारत प्रमुख अमोल गावंडे, कार्यक्रमाची तयारी करीत आहे. वरुड शहरातील सर्व योग शाळेतील योगशिक्षक, योग शिक्षिका या आंतरराष्ट्रीय योग दिनासाठी परिश्रम घेत आहेत.

# 'डरो मत...जे होणार ते होणारच : भास्कर जाधवांचा ठाकरेंना सल्ला, भाजपवरही घणाघात

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** _ ठाकरे शिवसेना पक्षातील सहा खासदारांच्या संभाव्य बंडामुळे निर्माण झालेल्या राजकीय संकटाच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि आमदार भास्कर जाधव यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना धीर देतानाच भाजपवर जोरदार निशाणा साधला आहे. 'डरो मत, बिलकुल डरो मत... जो होनेवाला वो होनेही वाला है', असे म्हणत त्यांनी उद्धव ठाकरेंना खंबीर राहण्याचा सल्ला दिला. तसेच पक्षासाठी हा मोठा धक्का असला तरी खचून न जाता नव्याने संघटन उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हे दिवसही जातील; नवसंजीवनी देण्याची वेळ भास्कर जाधव म्हणाले, 'पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना मी एवढेच सांगेन की, डरो मत, बिलकुल डरो मत... चिंता करू नका. जे होणार आहे ते होणारच आहे. मात्र, हे दिवसही निघून जातील. त्यासाठी आता काही कार्यक्रम आखावे लागतील, काही ठोस निर्णय घ्यावे लागतील आणि पक्षाची पुढील भूमिका निश्चित करावी लागेल'.



त्यांनी सूचक शब्दांत संघटनात्मक बदलांचीही गरज व्यक्त केली. दोन वर्षांपासून अफवांचे राजकारण सुरू' गेल्या दीड ते दोन वर्षांपासून सातत्याने उद्धव ठाकरेंचा पक्ष फुटणार, खासदार वेगळा गट स्थापन करणार किंवा दुसऱ्या पक्षात जाणार अशा अफवा पसरवल्या जात असल्याचा आरोपही जाधव यांनी केला.

# मुंबईत ऑटोरिक्षा चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश : १२ रिक्षांसह दोन आरोपी अटकेत



■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - खेरवाडी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने ऑटोरिक्षा चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत दोन सराईत आरोपींना अटक केली आहे.

आरोपींकडून चोरीस गेलेल्या १२ ऑटोरिक्षा जप्त करण्यात आल्या असून सुमारे ८ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या कारवाईमुळे मुंबईतील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या अनेक गुन्ह्यांची उकल झाली आहे. खेरवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील काही दिवसांपासून सीसीटीव्ही नसलेल्या भागांमधून ऑटोरिक्षा चोरीच्या घटना घडत होत्या. १५ जून रोजी बांद्रा पूर्व येथील कार्डिनल स्कूलसमोरील रस्त्यावर उभी असलेली एक ऑटोरिक्षा चोरीस गेल्याची तक्रार दाखल झाली होती. त्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केल्यानंतर मो. इक्बाल सिरताजअली शेख उर्फ लकी (वय २३) आणि मो. फरीद मिराजअली हाशमी (वय २०) हे दोघे संशयित आढळले. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी त्यांच्यावर पाळत ठेवली.

# शहरातील बहुतांश पानटपऱ्या बंद : मुंढे पॅटर्नचा धसका

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

## अन्न व औषधी प्रशासन (एफडीए) विभागाची धास्ती









**वरुड** - कडक शिस्त, धाडसी निर्णयक्षमता आणि भ्रष्टाचाराविरोधातील आक्रमक भुमिकेमुळे ओळखले जाणारे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषधी प्रशासन (एफडीए) विभागाच्या आयुक्तपदाची सूत्रे स्विकारताच राज्यभर धडक कारवाईचा सपाटा लावला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या तपासणी मोहिमेमुळे अनेक व्यापारी, खाद्य व्यावसायिक आणि भेसळखोरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या कारवाईची दहशत एवढी वाढली आहे की, गुटखा, पानमसाल्यांची सर्रास विक्री करणाऱ्या बहुतांश पानटपऱ्या बंद आहेत आणि ज्या उघड्या आहेत, त्यांनी विक्री बंद केली आहे.

तालुक्यात व प्रत्येक गावात गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखु यासारखे प्रतिबंधित साहित्य मोठ्या प्रमाणात विकले जाते. तालुक्यातल्या पानटपरी चालकांचा एक प्रकारे हाच मुख्य व्यवसाय आहे. गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्यात एफडीएचे अधिकारी सर्वत्र तपासणी करीत आहे. आपल्याही पानठेल्याची चौकशी होईल, या धास्तीने सर्वच घाबरले आहे. वरुड शहरातील आठवडी बाजार परिसर, पेट्रोल पंप चौक, महात्मा गांधी चौक, महात्मा फुले चौक, संत्रा लिलाव मंडी, राजुरा नाका, पांढुर्णा चौक, इंदिरा चौक, सावता चौक, मुलताई चौक, जायंटस चौक, बसस्थानक चौक तसेच इतर परिसरातील बहुतांश पानटपऱ्या आणि काही भागातील लहान व्यावसायिकांची दुकाने बंद असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे, तालुक्यातील अनेक गावांमधील पानटपरी चालकांनीही संभाव्य कारवाईच्या भीतीने आपले व्यवसाय तात्पुरते बंद ठेवणे पसंत केले आहे. हीच स्थिती अन्य तालुक्यांमध्ये आहे. एफडीएच्या वाढत्या हालचालींमुळे अन्नपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता, परवानग्या आणि नियमांचे पालन याकडे प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केल्याची चर्चा व्यापारी वतुर्ळात सुरू आहे. त्यामुळे नियमांचे पालन न करणारे व्यावसायिक सद्य: सावध भुमिका घेत आहेत.

**अनेकांना कारवाईची धास्ती**

अनेक ठिकाणी स्वच्छता, परवाने आणि अन्नसुरक्षा नियमांची पडताळणी सुरू आहे. तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार होणाऱ्या धडक कारवाईचा धसका घेत अनेक छोटे-मोठे व्यावसायिक, पानटपऱ्या चालकांनी आपली दुकाने बंद ठेवण्यातच धन्यता मानल्याचे चित्र दिसत आहे. विशेषतः भेसळयुक्त पदार्थ विक्री करणारे तसेच नियमांचे पालन न करता व्यवसाय करणारे व्यापारी अधिकच धास्तावले असून संभाव्य कारवाई टाळण्यासाठी त्यांनी तात्पुरता व्यवसाय बंद ठेवण्याचा मार्ग पत्करल्याची चर्चा बाजारपेठेत आहे.

# महात्मा फुले आणि आयुष्मान भारत योजनेच्या रुग्णांना मिळणार 'वेलकम किट'

## आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर : मंजुरीसाठी लागणारा कालावधी कमी करण्याबाबत सकारात्मक

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – राज्य सरकारच्या महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत उपचार घेणाऱ्या रुग्णांना आता अधिक सुलभ आणि सन्मानजनक सेवा मिळणार आहे.



या योजनांनुसार उपचारासाठी रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाचे खास 'वेलकम किट' देऊन स्वागत केले जाईल, अशी घोषणा सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी गुरुवारी केली मुंबई : राज्य सरकारच्या महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत उपचार घेणाऱ्या रुग्णांना आता अधिक सुलभ आणि सन्मानजनक सेवा मिळणार आहे. या योजनांनुसार उपचारासाठी रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाचे खास 'वेलकम किट' देऊन स्वागत केले जाईल, अशी घोषणा सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी गुरुवारी केली मुंबई : राज्य सरकारच्या महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत उपचार घेणाऱ्या रुग्णांना आता अधिक सुलभ आणि सन्मानजनक सेवा मिळणार आहे.


### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४८०/२०२६** **ने.ता.२६/०७/२०२६**

**अर्जदार :-**

१) चंद्रशेखर भोजराज टीकस, वय अं.४४ वर्ष, धंदा-मजुरी

२) भुमिकेश चंद्रशेखर टीकस, वय अं.१८ वर्ष, धंदा- शिक्षण

क्र.१ व २ रा.वरुड, ता.मोर्शी, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत छाया चंद्रशेखर टीकस, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२३/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१७/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**


# मान्सूनची प्रतीक्षा कायम! पुढील ४८ तास महत्त्वाचे, हवामान खात्याने दिला इशारा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – जून महिन्याचा अर्धा टप्पा संपत आला असला तरी महाराष्ट्रात मान्सून अद्याप पूर्णपणे सक्रिय झालेला नाही.



त्यामुळे राज्यातील अनेक भागांमध्ये उष्णता आणि दमट हवामानाचा त्रास वाढला असून नागरिकांसह शेतकरीही चिंतेत आहेत. हवामान विभागाने राज्यातील २४ जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे.

कोकण विभाग

कोकण विभागातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये उष्ण व दमट हवामान कायम आहे. काही ठिकाणी हलक्या पावसाच्या सरी पडण्याची शक्यता असली तरी तापमान ३६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत असल्याने उकाड्याचा त्रास वाढला आहे.

पश्चिम महाराष्ट्र

पश्चिम महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात काही भागांत विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

# बिगर वैद्यकीय ट्रॅव्हल इन्शुरन्स क्लेम्सचे प्रमाण वाढले

## ट्रिप रद्द होणे, विनाविलंबसारख्या घटना वैद्यकीय प्रकरणांपेक्षा अधिक

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नवी दिल्ली** – बिगर वैद्यकीय ट्रॅव्हल इन्शुरन्स क्लेम्सचे प्रमाण वैद्यकीय विम्याच्या दाव्यांपेक्षा मोठ्या फरकाने वाढत आहे.

ट्रिप रद्द होणे किंवा उशीर होणे, सामानाचे नुकसान किंवा विनाविलंब आणि इतर ऑपरेशनल आव्हानांशी संबंधित नॉन-मेडिकल क्लेम्सचे प्रमाण प्रवाशांनी दाखल केलेल्या वैद्यकीय क्लेम्सपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहे.

मुंबईत मुख्यालय असलेल्या ट्रॅव्हल असिस्टन्स आणि इन्शुरन्स कंपनी 'असेगो'ने २०२५-२६ च्या आकडेवारीचा हवाला देत सांगितले की,पारंपारिकपणे केवळ




वैद्यकीय संरक्षणासाठी खरेदी केला जाणारा ट्रॅव्हल इन्शुरन्स आता प्रवाशांना इतर अनेक प्रकारच्या जोखमींपासून सुरक्षित ठेवण्यासाठी वापरला जात आहे.

असेगो कंपनीने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये एकूण २०,००० क्लेम्सच्या प्रक्रियेत प्रवाशांना मदत केली. भारतात अनेक कार्यालयांसह प्रमुख आंतरराष्ट्रीय ठिकाणांवर कार्यरत असलेल्या 'असेगो'चे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी देव कारवट यांनी या ट्रेंडवर भाष्य केले.

त्यांनी सांगितले की, क्लेम्स असिस्टन्सचा हा ट्रेंड स्पष्टपणे दर्शवतो की आजच्या काळात ट्रॅव्हल प्रोटेक्शन हे केवळ वैद्यकीय आणीबाणीपुरते मर्यादित राहिलेले नसून ते प्रवाशांच्या अनेकविध गरजा पूर्ण करत आहे. आजचा प्रवासी आपल्या संपूर्ण प्रवासातील अनिश्चितता सुरक्षित करण्यासाठी या विम्याचा वापर करत आहे.


बदलत्या कलाची मुख्य कारणे ट्रिप रद्द होणे : ऐनवेळी प्रवास रद्द करावा लागल्याने होणारे नुकसान.

प्रवासाला उशीर होणे : विमाने किंवा इतर वाहतूक साधनांना होणाऱ्या विलंबाचा फटका. सामानाची अडचण : सामान गहाळ होणे, उशिरा मिळणे किंवा त्याचे नुकसान होणे. परिचलन आव्हाने : प्रवासादरम्यान येणाऱ्या इतर व्यवस्थापकीय अडचणी.

# 'शालार्थ आयडी घोटाळा' हा सुनियोजित कट – सत्र न्यायालय : उपासनीच्या जामिनावर उद्या सुनावणी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नाशिक** – नाशिक विभागातील बोगस शालार्थ आयडी घोटाळा प्रकरण राज्यात गाजत आहे. नाशिकरोड पोलीस ठाण्यात या संदर्भात गुन्हा दाखल




असून या प्रकरणाने विभागातील ५०० हून अधिक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मुख्याध्यापक आणि संस्थाचालक अडचणीत आले आहेत. शालार्थ आयडी घोटाळ्याबाबत नाशिकरोड पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी एका गुन्ह्याचा तपास विशेष तपास पथकामार्फत सुरू आहे. या गुन्ह्यातील संशयित व सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी नितीन उपासनीच्या जामिनाबाबत उद्या शुक्रवारी (दि.१९) सुनावणी होणार आहे. दरम्यान, शैक्षणिक संस्थाचालक, मुख्याध्यापक आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संगनमत करून संशयितांनी सुनियोजित कट रचत फसवणूक केल्याचे निरीक्षण नाशिकरोड सत्र न्यायालयाने पोलीस तपासाच्या आधारे नोंदविले आहे. 'शालार्थ आयडी घोटाळा' हा सुनियोजित कट नाशिकरोड पोलीस ठाण्यात मार्च २०२६ मध्ये दाखल गुन्ह्यात तत्कालीन शिक्षणाधिकारी संशयित नितीन बच्छावचा जामीन यापूर्वीच फेटाळण्यात आला आहे. बच्छाव याचा जामीन अर्ज फेटाळताना पोलिसांच्या तपासाच्या आधारे हा गुन्हा केवळ तांत्रिक स्वरूपाचा गुन्हा नसून, मुलांच्या शिक्षणासाठी असणाऱ्या सार्वजनिक पैशांची पद्धतशीर केलेली लूट आहे. त्यामुळे पात्र शिक्षकांचे हक्क हिरावले गेले असून, शिक्षण व्यवस्थेचे मोठे नुकसान झाले आहे. हा एक सुनियोजित कट असलेला पांढरपेशा गुन्हा असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले आहे.

# बाळासाहेब ठाकरेंचे विचार काँग्रेसला विकल्यानेच 'उबाठा'चे अध:पतन

## भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांचा प्रहार

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**पुणे** – महाराष्ट्राच्या राजकारणाचा गोलपिठा झाला आहे असे म्हणणारे संजय राऊतच त्या गोलपिठावर बसून आहेत. तुमचे आजचे ट्विट म्हणजे हातात कबाब घेऊन शाकाहारावर भाषण करण्यासारखे आहे.

वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोडून आता तुम्ही लोकांना शहाणपण शिकवत आहात. आपले विचार काँग्रेसला विकलेल्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाच्या अध:पतनावर भाष्य करू नये.

दलाली करण्याची आणि सत्तेसाठी विचार विकण्याची सुरुवात महाराष्ट्रात २०१९ मध्ये उबाठा गटाने केल्याने तुमच्या पक्षाचा आणि तुमच्या पक्षप्रमुखांचे राजकीय अध:पतन झाले, असा प्रहार भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन




यांनी गुरुवारी केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. नवनाथ बन म्हणाले की, संजय राऊत, तोडफफोडीची भाषा तुम्ही करू नका. महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्थेचे राज्य आहे. जो कोणी कायदा हातात घेईल, त्याला सोडले जाणार नाही. २०१९ मध्ये एकनाथ शिंदे यांनी मूळ शिवसेना आपली असल्याचे सांगितले होते त्यावेळीही संजय राऊत यांनी तोडफफोड, मारपीट आणि धमक्यांचीच भाषा वापरली होती. आजही तुम्ही कितीही आव्हाने द्या, महाराष्ट्रात कायद्याचे राज्य आहे. कुणीही कायदा हातात घेतला, तर त्याला कायद्यानुसार चोख उत्तर दिले जाईल.

वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी म्हटले होते की, 'माझा पक्ष काँग्रेसच्या दावणीला बांधण्यापेक्षा मी माझे दुकान बंद करेन.' संजय राऊत वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे हे विचार तुम्ही आत्मसात करणार आहात का? बाळासाहेबांचे हिंदुत्व तुम्ही स्वीकारणार आहात का? तुम्ही आज राहुल गांधी यांच्यासोबत बसता, सोनिया गांधीं यांचे लुगडे धूत आहात. हे बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांच्या विचारांत किंवा शिवसेनेच्या भूमिकेत कधीच सांगितले नव्हते.

बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोयीप्रमाणे वापरू नका. बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते की, 'विचारांशी प्रतारणा करणाऱ्याला जोडे फोडा.' तोच न्याय लावायचा असेल, तर सर्वाधिक प्रश्न संजय राऊत आणि उबाठा गटाला विचारले पाहिजेत, असेही बन म्हणाले. संजय राऊत, काँग्रेसकडे सत्तेसाठी जात असताना तुम्ही नेमके किती पैसे घेतले होते? राहुल गांधींकडून किती कोटी रुपये घेतले होते? महाराष्ट्रात काँग्रेसच्या दावणीला पक्ष बांधण्यासाठी किती हजार कोटी रुपयांची डील केली होती? याचे उत्तर एकदा महाराष्ट्राला दिले पाहिजे.


### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४७४/२०२६** **ने.ता.२३/०७/२०२६**

**अर्जदार :-**

नसरीन सबा सलीमुद्दीन काजी

वय अं.४४ वर्ष, धंदा-गृहिणी

रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ह.मु.महात्मा फुले बाजार, नागपूर, ता.जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत सलीमुद्दीन अलाउद्दीन काजी, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२३/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१७/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.एम.डी.सौंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४२३/२०२६** **ने.ता.०४/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) वंदना देवेंद्र सोनारे, वय अं.६० वर्ष, रा.वरुड, २) सौ.कल्पना रामेश्वर बारेदार, वय अं.५५ वर्ष, रा.फ्लॅट नं.३०२, अनारविला अपाटमेंट, लाईन नं.२, श्याम नगर, रुक्मिणी नगर अमरावती, ३) श्री.उमेश गुणवंतराव दवंडे, वय अं.५३ वर्ष, रा.वाठोडा, ४) सौ.भावना विलासराव ठाकरे, वय अं.५० वर्ष, रा.वाठोडा, ५) सौ.अर्चना रविकांत धाडसे, वय अं.४८ वर्ष, रा.हाऊस नं.४६, नई जैताला रिंग रोड, हनुमान मंदिर के पास, अगने लेआऊट (ए), खामला, नागपूर, ६) सौ.प्रेरणा उमेश महल्ले, वय अं.४६ वर्ष, रा.अजीक्य-१, हाऊसिंग सोसायटी, आर.एच.१८४/१ए फ्लॅट नं.११, शाहु नगर जी ब्लॉक, एम.आय.डी.सी.चिंचवड, पुणे, ता.जि.पुणे

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत गुणवंत तुकाराम दवंडे व मयत कमल गुणवंतरा दवंडे, रा.वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०४/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१५/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




## तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाण | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |
| नाशिक | २६ | २२ |
| पुणे | ३० | २१ |

# सन २३-२४ मधील गारपिटचे पैसे शेतकऱ्यांना द्या

### मनोज गुर्जर व अंकुश बोडनासे यांची तहसिलदारांकडे मागणी

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**वरुड** – तालुक्यातील राजुरा बाजार व लोणी महसुल मंडळ येथील सन २०२३-२४ मधील राहिलेले गारपिट पैसे संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावे, अशी मागणी मनोज गुर्जर व अंकुश बोडनासे यांनी तहसिलदार यांचेकडे एका निवेदनाव्दारे केली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांची केवायसी पुर्ण झाली असून शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झालेले नाही व खरीप हंगाम चालु होवुन शेतकऱ्यांकडे खत बि-बियाणे व फवारणी औषध आणण्यासाठी पैशाची आवश्यकता असते तसेच संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांचे पैसे खात्यात लवकरात लवकर जमा करण्यात यावे, अशी मागणी सुध्दा मनोज गुर्जर व अंकुश बोडनासे यांनी केली आहे.

# ग्रामीण संघर्षाची कहाणी मांडणारा 'अंत' लघुपट चर्चेत

### गजानन ब्राम्हणे, प्रज्ञा बोडखे यांचेसह अनेकांनी साकारली भुमिका

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*




**वरुड** – पी.एच.फिल्म प्रेझेंटस निर्मित 'अंत' हा मराठी लघुपट सामाजिक वास्तव आणि मानवी भावनांवर आधारित प्रभावी कथानक मांडणारा चित्रपट आहे.

या लघुपटाचे दिग्दर्शन प्रफुल बाहातकर यांनी केले असून कथा आणि पटकथेतून ग्रामीण भागातील समस्यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे या चित्रपटाच्या निर्मितीपासुन ते छोटीशी भुमिका करणारे प्रत्येक वरुड तालुक्यातील असून दिग्दर्शक प्रफुल बाहातकर हे येथुन जवळच असलेल्या बहादा येथील रहिवाशी आहेत. आई, वडिल आणि १८ वर्षाची मुलगी यांची 'अंत' ही कहाणी असून अत्यंत सुबकता वापरुन तयार करण्यात आलेला लघुपट गेल्या १५ जुन रोजी कॅंच मी टी.व्ही.च्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रकाशित करण्यात आला आहे.

या लघुपटामध्ये संघर्ष, नातेसंबंध, सामाजिक परिस्थिती आणि मानवी जीवनातील कठीण प्रसंग यांचे वास्तववादी चित्रण करण्यात आले आहे.

पोस्टरवरुन चित्रपटात एका कुटुंबाच्या किंवा समाजातील व्यक्तींच्या जीवनातील वेदना, संघर्ष आणि शेवटच्या टप्प्यावर येणारे निर्णय यांचे प्रभावी दर्शन घडत असल्याचे दिसून येते.

या लघुपटात मुळचे जरुड येथील रहिवाशी गजानन ब्राम्हणे, विविध सामाजिक कार्यात हिरारीने सहभाग असलेल्या प्रज्ञा बोडखे, राजुरा बाजार येथील रहिवाशी चारु पाटील, डॉ.अरविंद बडघरे, आनंद पवार, रोशन पाटील यांचेसह अनेकांनी भूमिका साकारल्या आहेत. चित्रपटाचे लेखन प्रफुल बाहातकर आणि विनोद बगाडे यांनी केले आहे.

चित्रपटातील पार्श्वसंगीत, ध्वनी संयोजन आणि छायाचित्रणामुळे कथेला अधिक प्रभावीपणे सादर करण्यात आले असून प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडणारा हा लघुपट ठरणार असल्याची प्रतिक्रिया चित्रपटप्रेमींमध्ये व्यक्त होत आहे.



"'अंत' हा केवळ मनोरंजनासाठी नसून समाजातील वास्तवाला आरसा दाखवणारा आणि प्रेक्षकांच्या मनाला स्पर्श करणारा लघुपट आहे. ग्रामीण भागातील अनेक न बोलल्या जाणाऱ्या विषयांना यात वाचा फोडण्यात आली आहे, अशी प्रतिक्रिया या चित्रपटात प्रमुख भुमिका निभावणारे अभिनेता गजानन ब्राम्हणे यांनी व्यक्त केली.

# खरीप हंगामात गांजा पेरणीसाठी शासकीय परवानगी द्या

### तालुका संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्र्यांकडे मागणी

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**वरुड** – खरीप हंगामात गांजा पेरणीसाठी शासकीय परवानगी मिळणे तसेच शेतीला जोड व्यवसाय म्हणुन मोहफुलाची दारु निर्मिती आणि विकण्याची परवानगी देण्यात यावी, अशी मागणी वरुड तालुका संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे एका निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, आम्ही कर्ज बाजारी सर्व शेतकऱ्यांनी आपणास कधीही कर्जमाफी मागितली नाही. मागितली आहे ती शेतमालास हमी भाव पण आपण त्यावर कोणताही तोडगा काढला नाही आणि आमच्यावर कर्जाचे डोंगर दैनंदिन वाढतच आहे. आपण सन २०२४ च्या निवडणुकी पूर्वी राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करु, असे दिलेले आश्वासन पाळले नाही उलटं त्यात जाचक अटी टाकून ठेवल्यामुळे आता जीव कासावीस झाला आहे.

पण आता आम्ही आत्महत्या करणार नाही तर आत्महत्येचा विचार मनात आणण्याऐवजी आत्मसन्मानाने जगण्यासाठी आमच्याच शेतात गांजाची शेती आणि मोहफुलाच्या दारु निर्मितीचा जोड व्यवसाय करण्याचा संकल्प केला आहे.

म्हणुन आमच्यावर असलेले कर्ज माफ न करता आमच्या या संकल्पाला शासनाची मान्यता मिळावी म्हणुन आपणाकडे कळकळीच्या विनंतीसह आमच्याच शेतात गांजा उत्पादनाची आणि शेतीला जोड धंदा म्हणुन मोहफुलाच्या दारु निर्मिती आणि विक्रीची शासन परवानगी देण्यात यावी, अशी मागणी सोपान ढोले, माजी पं.स.सभापती राजाभाऊ कुकडे, माजी नगरसेवक संजय डफरे, वाई खुर्दचे सरपंच रुपेश फुसे यांच्यासह शेतकऱ्यांनी केली आहे.

# पतीच्या हयातीत घटस्फोटीत पत्नीला वाढीव पोटगी मागण्याचा अधिकार

### उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निवाळा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – घटस्फोटित पत्नीला पत्नीच्या निधनानंतर त्याच्या वारसाकडून अथवा त्याच्या संपत्तीतून वाढीव पोटगी मागण्याचा अधिकार नाही. पती जिवंत असेपर्यंत तो अधिकार राहतो. त्याच्या मृत्यूनंतर हा वैयक्तिक हक्क संपुष्टात येतो, असा महत्त्वपूर्ण निवाळा उच्च न्यायालयाने दिला.

न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने हा निवाळा देताना कौटुंबिक न्यायालयचा निर्णय कायम ठेवला. याचिकाकर्त्या महिलेचा १९७३ मध्ये विवाह झाला. चार वर्षाच्या संसारानंतर १९७७मध्ये ते विभक्त झाले होते. दीर्घकालीन न्यायालयीन वादानंतर कौटुंबिक न्यायालयाने मे १९९९ रोजी त्यांना घटस्फोट मंजूर करत महिला याचिकाकर्तीला प्रतिमहिना ६ हजार रुपये पोटगी मंजूर केली. कौटुंबिक न्यायालयाच्या या निर्णयाविरुद्ध दोघांनीही उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. दरम्यान २००५ मध्ये दोघांच्या गैरहजेरीमुळे न्यायालयाने दोघांची अपीले फेटाळून लावली. त्यानंतर १५ मार्च २०१२ रोजी विभक्त पतीचे निधन झाले. पतीच्या निधनानंतर या महिलेने त्याच्या वारसांकडून पोटगीची थकबाकी वसूल करण्याबरोबरच पोटगी वाढवून मिळावी म्हणून कौटुंबिक न्यायालयात दाद मागितली होती.

कौटुंबिक न्यायालयाने फेब्रुवारी २०२३ रोजी याचिकाकर्तीला मृत पतीच्या संपत्तीतून पोटगीची थकबाकी वसूल करण्यास परवानगी दिली, मात्र पोटगी वाढविण्याची मागणी फेटाळून लावली. त्या विरोधात महिलेने अपील दाखल केले. त्या अपीलावर खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी पती हयात नसताना पोटगी वाढवून देता येते का, असा प्रश्न उपस्थित झाला. यावेळी कायदेशीर बाजू तपासण्यासाठी न्यायालयाने वरिष्ठ वकील ॲड.दीपा चव्हाण यांची 'न्यायमित्र' म्हणून नियुक्ती केली.

